**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे द्वारा आयोजित**

# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा

**सन 2023-2024**

**नवोपक्रम गट क्र. 5**

गट : अध्यापकाचार्य व पर्यवेक्षकिय अधिकारी गट

**नवोपक्रमाचे शीर्षक**

## " शिक्षक आणि तंत्रज्ञान"

सादरकर्ते




**श्री भूपेश शंकरराव चव्हाण**

केंद्रप्रमुख,

केंद्र गुमगांव पं.स. हिंगणा, जि. प. नागपूर

**प्रतिज्ञापत्र**

मी श्री/श्रीम/डॉ. भूपेश शंकरराव चव्हाण प्रतिज्ञापत्र लिहून देतो/ देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला "शिक्षक व तंत्रज्ञान" हा नवोपक्रम माझ्या स्वत:च्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वत:ला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : 20/11/2023 केंद्रप्रमुख — स्पर्धकाची स्वाक्षरी
स्थळ : हिंगणा गुमगाव — समूह साधन केंद्र-गुमगाव पं. स. हिंगणा — नाव भूपेश चव्हाण
शाळेचा /कार्यालयाचा शिक्का

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीम/डॉ. भूपेश शंकरराव चव्हाण हे माझ्या शाळेत / कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला "शिक्षक व तंत्रज्ञान" हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये त्यांनी स्वत: राबविलेला असून तो त्यांच्या स्व-परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : 24-11-2023 — शाळा/ कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी
स्थळ : हिंगणा — नाव श्रीमती ज्योत्स्ना हरडे
शिक्का: गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, हिंगणा

# परिचय

| | | |
|---|---|---|
| **संपूर्ण नाव** | : | **श्री भूपेश शंकरराव चव्हाण** |
| **घरचा पत्ता** | : | 401, रुद्र अवतार अपार्टमेंट, शेषनगर बस स्टॉप जवळ, मानेवाडा, नागपूर |
| **इमेल आयडी** | : | chavhanbhupesh@gmail.com |
| **भ्रमणध्वणी क्रमांक** | : | 9822715058 |
| **जन्म दिनांक** | : | 4 एप्रिल 1974 |
| **लिंग** | : | पुरुष |
| **वय** | : | 49 |
| **शाळेचे नाव व पता** | : | समुह साधन केंद्र, गुमगाव, पं.स. हिंगणा, जि.प. नागपूर |
| **व्यवस्थापनाचा प्रकार** | : | जिल्हा परिषद |
| **शाळेचा भ्रमणध्वनी क्रं.** | : | 9822715058 |
| **पदनाम** | : | केंद्रप्रमुख |
| **नियुक्ती दिनांक** | : | 30/07/1996 |
| **सेवेत रुजु होताना धारण केलेली शैक्षणिक अर्हता** | : | एस.एस.सी, डी.एड. |
| **व्यवसायिक शैक्षणिक** | : | बीए., एम.ए., बीएड., एम.एड. |

# नवोपक्रमाची अनुक्रमणिका


1. नवोपक्रमाचे शीर्षक व प्रस्तावना

2. नवोपक्रमाची गरज व महत्त्व

3. नवोपक्रमाची उद्दिष्टे

4. नवोपक्रमाचे नियोजन

5. नवोपक्रमाची कार्यपद्धती

6. नवोपक्रमाची यशश्वीता

7. फलनिष्पत्ती उद्दिष्टानुसार

7. समारोप

8. संदर्भसूची व परिशिष्टे

9. युट्युब लिंक्स

# शिक्षक आणि तंत्रज्ञान

**(शिक्षक व अधिकाऱ्यांना दैनंदिन कामकाजात नाविन्यता आणण्यासाठी प्रोत्साहन देणे)**

**प्रस्तावना :-**

माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात वावरतांना बांध्यापासून चांद्यापर्यंत पोहचलेल्या तंत्रज्ञानाची कास न धरता पुढे वाटचाल होऊच शकत नाही.

कामकरी, शेतकरी, मजूर, भाजीवाले, फेरीवाले सगळेच लोक तंत्रज्ञानाचा वापर आप-आपल्या परीने करत आहेत. स्वतः विकसीत होऊन आपल्या सहकारी, कुटुंब आणि मुलाबाळांपर्यंत लोण पसरवत आहेत. अशा प्रसंगी भारत देशाने तर उद्दीष्टच ठेवले आहे. 2024 पर्यंत 75 टक्के कार्य हे पेपरलेस करणे म्हणजे कागदाचा वापर कमी करून तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे.

हे उद्दीष्ट जर भारताचे आहे तर अशावेळी भारतातील शिक्षकांनी सुद्धा "पेपरलेस" होणे गरजेचेच.... पण खरच आमचे शिक्षक तंत्रज्ञानाचा वापर पुरेशा प्रमाणात करतात काय ? तर यासाठी मी स्वतः शिक्षकांना अनेक आव्हाने केली. जसे **PPT** तयार करुन पाठवणे, प्रत्येक शिक्षकाने **email** करणे, **excel Sheet** मध्ये माहिती भरुन पाठविणे, **Video** निर्मिती करणे **Video Edit** करुन त्यात लेखन करणे, संगीत टाकणे, विद्‌यार्थ्यांची यादी मोबाइलमध्ये तयार करुन गुणदान भरणे ई. परंतू या कामात आमचे शिक्षक फार मागे दिसून आले. **2021-2022** मध्ये मी अशी चाचणी घेतली आणि विचार केला. **2023-24** मध्ये आमच्या शिक्षकांनी तंत्रज्ञानात सक्षम होणे गरजेचेच आहे. म्हणून सुरुवात केली आणि हाती घेतला हा उपक्रम **"शिक्षक आणि तंत्रज्ञान".**

# नवोपक्रमाची माझी गरज

## 1) नवोपक्रम घेण्यामागील कारणे :-

माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात आमचे शिक्षक किती सक्षम आहेत हे पाहण्यासाठी जेव्हा शिक्षकांना **email** करण्यासाठी आव्हान केले तेव्हा समजले की अनेकांना स्वतःचा **email id** च माहित नाही, **excel Sheet** मध्ये माहिती भरण्याचे आव्हान केले तर त्यातही आमच्या शिक्षकांचा निरुत्साह. त्याचवेळी **Convent, English Medium** च्या शिक्षकांसारखे तंत्रज्ञान वापरात आमचे शिक्षक फारच मागे असल्याचे दिसून आले. याचे मूळ कारण म्हणजे तंत्रज्ञानाची भिती, निरुत्साह, अज्ञान......

म्हणून शिक्षकांचा उत्साह वाढवण्यासाठी, त्यांच्या वर्गाची संपूर्ण माहिती त्यांच्या मोबाईलमध्ये साठवण्यासाठी, शाळेतील उपलब्ध संगणकाचा पुरेसा वापर करण्यासाठी, विद्यार्थी, पालक, प्रशासन यांच्याशी संपर्कात राहण्यासाठी, कार्य गतीने करण्यासाठी आणि शिक्षकांची तंत्रज्ञानाच्या वापराची भिती दूर करून त्यांचा उत्साह वाढवण्यासाठी हा नवोपक्रम हाती घेतला. **"शिक्षक आणि तंत्रज्ञान"**

## 2) नवोपक्रमाचे वेगळेपण :-

या उपक्रमात शिक्षकांना आव्हाने देऊन, ठरावीक वेळ देऊन, स्पर्धा लाऊन, प्रत्यक्ष माझ्या समक्ष वापर करण्यास लाऊन हे कार्य पूर्ण करुन घेण्यात आले. आता शिक्षक एकमेकांचे केवळ सहकारीच नाही तर मार्गदर्शक झाले आहेत, स्पर्धक नव्हे तर पुरस्कर्ते झाले आहेत, वयाचे बंधन समोर न आणता तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत.

- कृतीतून आव्हाने पूर्ण केलेले आहे.
- तंत्रज्ञानाचा वापर सोपा केला आहे.

- कार्यवादावर भर देण्यात आला आहे.
- आधि केले मग सांगितले - हा तत्व वापरला आहे.
- शिक्षक हा केवळ सांगणारा घटक नसून विद्‍यार्थ्यांसाठी बौद्धीक आणि नैतिक
- आदर्श म्हणून कार्य करणारा घटक ठरला आहे.
- ॲरिस्टॉरलचे वास्तववाद आणि जॉन डूयईचे कार्यवाद हा माझ्या उपक्रमाचा पाया आहे.

**नवोपक्रमाची उपयुक्तता**

आमच्या जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक हे तंत्रज्ञानाच्या वापरात भक्कम होतील. त्यांच्याजवळ असलेल्या मोबाइलमध्ये त्यांच्या वर्गाची, शाळेची संपूर्ण माहिती राहील. कोणत्याही शहरात असले तरी विद्‍यार्थ्यांची कोणतीही माहिती वर्गशिक्षक, मुख्याध्यापक म्हणून देता येईल. शिक्षकांचा वेळ, श्रम वाचेल. कार्याला गतीमानता येईल, पेपरलेस काम होईल.

**नवोपक्रमाची उद्दीष्टे**

माझा नवोपक्रम वास्तववाद व कार्यवादावर अवलंबून आहे. वास्तववादात **Visuals** ला महत्व आहे. जे जसे आहे तसे दाखवणे, शिक्षकांचे कार्य हे काल्पनिक नसून वास्तव स्थिती दाखवणारे आहे. म्हणून वर्गाची, शाळेची वास्तव स्थिती दाखवणे - माहिती देणे हे महत्वाचे तसेच कार्यवाद असे म्हणतो की, केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता प्रत्यक्ष कृतीतून, प्रयोगातून जे अनूभव मिळतात ते चिरकाल टिकतात. म्हणून जगाला जर संदेश द्‍यायचाच असेल तर भारताने निश्चित केलेले उद्दीष्ट केवळ काल्पनिक नसावे ते प्रत्यक्षात आणण्यासाठी शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा वापर करणे “पेपरलेस” कार्यालय, “पेपरलेस” वर्ग - पेपरलेस शिक्षक तयार करणे आवश्यक राहील म्हणून खालील उद्दीष्टे निश्चित केलीत.

1) तंत्रज्ञानाचा वापर करुन गतीमानता आणणे.

2) तंत्रज्ञानाच्या वापरात शिक्षकांचा आत्मविश्वास वाढवणे.

3) स्वतःच्या कार्याचे प्रमाण तंत्रज्ञानाच्या वापरातून दाखवणे.

4) शिकवणे हे कंटाळवाणे न ठेवता परिणामकारक व आनंदी करणे.

5) माहिती देणे व घेणे हे कार्य सहज व सोपे करणे.

6) वर्ग - शाळा - पेपरलेस करण्याकडे वाटचाल करणे.

## नवोपक्रमाचे नियोजन

कोणत्याही कार्याची यशस्वीता ही त्या कार्याच्या नियोजनावर अवलंबून असते. **“शिक्षक आणि तंत्रज्ञान”** या उपक्रमाचे नियोजनही त्याच प्रमाणे नियोजित केले. या नवोपक्रमात सर्व टप्पे आणि कृती यांचा काळ निश्चित करुनच उपक्रम राबविण्यात आला.

### 1) नवोपक्रमाची व्याप्ती व मर्यादा

प्रस्तूत उपक्रम हा हिंगणा तालूक्यातील, गुमगाव केंद्रातील जिल्हा परिषद शाळेत कार्यरत 32 शिक्षकांसाठी मर्यादीत होता.

### 2) नवोपक्रमाचा कालावधी

सदर नवोपक्रम सन 2023 - 24 या शैक्षणिक वर्षासाठी घेण्यात आला. या उपक्रमासाठी जून 2023 ला शिक्षकांची सभा घेऊन त्यांना विविध आव्हाने देण्यात आली. ऑक्टोबर 2023 पर्यंत प्रत्येक शिक्षकांनी स्वतःचा **You tube** चॅनल तयार करण्यापर्यंत उद्दीष्ट ठेवण्यात आले.

## 3) नवोपक्रमाचा अपेक्षित अभ्यासक्रम

- **E-mail account** चा वापर.
- **Excel sheet** चा वापर.
- **Video shoot** करणे, **Edit** करणे.
- विविध **Online course** मध्ये सहभाग घेणे.
- दिलेले आव्हान पूर्ण करणे.

## 4) नवोपक्रम कार्यवाहीचे टप्पे

| कालावधी | उपक्रम |
|---|---|
| जून ते जूलै 2023 | ईमेल करणे, **email** वरुन **Copy, print** करणे, आलेल्या **email** ला **Reply** करणे. **E-mail forward** करणे. |
| ऑगस्ट ते सप्टें 2023 | **Excel sheet** तयार करणे - विद्यार्थी गुणदान करणे, **Save** करणे, **Edit** करणे, पाठविणे. विविध **Online course** मध्ये सहभाग घेणे. |
| ऑक्टो - ते नोव्हे 2023 | **Video** निर्मिती, **Edit** करणे, विविध ॲपचा वापर, **You tube** चॅनल तयार करणे. शाळेची माहिती मोबाईल द्वारे पाठविणे. |

## 5) पूर्व स्थितीचे निरीक्षण

सुरुवातीला आमच्या शिक्षकांना **What's App** चा वापर करता येत होता. परंतू त्यातील **Post tag** करणे, **Reply** देणे, **Email** उघडून पाहणे, **Excel sheet** उघडणे, **Edit** करणे, **Video** तयार करणे इत्यादी बाबी माहित नसल्यागत होत्या. त्यामूळे वरील सर्व शब्द जरी माहित होते तरी प्रत्यक्ष वापर मात्र माहित नव्हते. शिवाय कंटाळा, निरुत्साह आणि आव्हाने नव्हती, म्हणून तंत्रज्ञानाचा वापर सोयीचे आहे हे माहित नव्हते. वर्गाची, शाळेची माहिती आपल्या मोबाईल मध्ये कशी जपून ठेवावी हे कळायला वेळ लागला.

**6) संबंधीत व्यक्तीची, तज्ञांशी चर्चा**

2021 ला या गुमगाव केंद्रात बदलीने आलो आणि या केंद्रातील शिक्षकांच्या तंत्रज्ञानाच्या वापराविषयी समस्या पाहिल्या तेव्हा मी स्वतः विविध सभामधून, शिक्षण परिषदेतून शिक्षकांना मोबाईलच्या वापराविषयी 15 मिनिटे, कृती घेऊ लागलो. शिवाय नागपूर जिल्ह्यात मा. **CEO** श्रीमती सौम्या शर्मा मॅडमच्या नेतृत्वात **Vinoba App** चे उपयोजन सुरु झाले होते.

त्या **Team** मधले विश्वजीत पवार, श्री. विशाल डहाट, निलेश यांचे सहकार्य घेऊन, शिक्षण परिषदेत बोलावून मार्गदर्शन घेतले व माझ्या केंद्रातील शिक्षकांना मोबाईलवर **Vinoba App** चा वापर कसा करावा हे शिकवण्यात आले.

**नवोपक्रमाची कार्यपद्धती**

**1. प्रत्यक्ष कृतींवर भर -**

माझ्या नवोपक्रमाचे नाव **"शिक्षक आणि तंत्रज्ञान"** असा आहे. तंत्रज्ञान मिळवून उपयोग नाही तर प्रत्यक्ष कृती करुन अनुभव घेतला तरच तंत्रज्ञान उपयोगाचे.

या उपक्रमात प्रत्येक शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा वापर करणे, प्रत्यक्ष वर्गात, शाळेत **You Tube** चा उपयोग करुन विद्यार्थ्यांच्या कार्यांस सर्वांपर्यंत पोहोचवणे, पालकांना वारंवार शाळेत न बोलावता बहूतांश माहिती स्वतःजवळ ठेवणे, विद्यार्थ्यांच्या कार्याच्या नोंदी पालकांना मोबाईलवर देणे अशा कृतीवर आधारीत हा उपक्रम अवलंबून आहे.

**अध्ययन अनुभव**

हा उपक्रम संपूर्णतः तंत्रज्ञान व कृतीवर अवलंबून आहे. तंत्रज्ञानाची भिती दूर करण्यासाठी प्रथमतः मोबाईलवर सोप्या कृती करुन घेतल्या. जसे **What's App Post** ला **Tag** करुन **Reply** देणे **Post Copy Paste** करणे, **Wps App** चा वापर

हळूहळू - एकेक कृती करुन घेतल्या. त्यांच्या मनातील अनेक प्रश्न विचारण्याची मुक्त संधी देण्यात आली. सहकारी शिक्षकांच्या सहकार्याने शिकण्याची संधी देण्यात आली.

प्रत्येक शिक्षकांना स्वतंत्र आव्हान देऊन कार्यपूर्ती करुन घेतली. प्रत्यक्ष सादरीकरणाची संधी देण्यात आली. त्यांनी केलेल्या कार्याचे कौतूक सर्वांसमोर करण्यात आले. यामूळेच **"शिक्षक आणि तंत्रज्ञान"** हा उपक्रम माझ्या केंद्रात प्रभाविपणे राबवू शकलो.

### 3.1 पूर्वस्थितीचे निरीक्षणे व त्यांच्या नोंदी

- मोबाईलचा मर्यादीत वापर करता येत होता. परंतू माहितीचे आदान प्रदान करण्यासाठी मोबाईल प्रभावी साधन आहे हे माहीत नव्हते
- तंत्रज्ञानाचा वापर करुन वर्ग, शाळा पेपरलेस होऊ शकते हे माहीत होते परंतू प्रत्यक्ष कृती मात्र तशी नव्हती.
- शाळेत संगणक होते मात्र त्यांचा उपयोगच नव्हता.
- विद्यार्थी कृतीतिल आहेत, शाळेत खूप चांगले उपक्रम सुरु आहेत मात्र त्यांचा प्रचार व प्रसार करता येत नव्हते.
- **Online** शिक्षण घेता येते हे त्यांनी ऐकले होते परंतू स्वतः मात्र कोणताही कोर्स केला नव्हता.

### 3.2 कार्यवाही दरम्यान निरीक्षण व माहितीचे संकलन

- हा उपक्रम शिक्षकांसाठी होता, मानसिकता तयार करण्यासाठी थोडा त्रास झाला. मोबाईल स्वतःचा आहे.
- **Internet Pack** संपला आहे, अशा सबबी समोर आल्या.
- हळूहळू एक एक आव्हान पूर्ण करु लागले

- नवोपक्रमाचा पहिला टप्पा कठीण गेला, **email ID** व **Password** माहित नव्हते.
- सर्वांना **email id** तयार करुन दिले व माझ्या उपक्रमाला गती प्राप्त झाली.

## 3.3 उपक्रम पूर्ण झाल्यावर निरिक्षणे व त्यांच्या नोंदी

- हा नवोपक्रम प्रायोगीक व गुमगाव केंद्रापूरता असल्याने विशिष्ट मर्यादा ठरली आहे.
- हा उपक्रम, यातील कृती अतिशय उपयुक्त असल्यामुळे याची कठिण्य पातळी
- वाढवत चालू ठेवण्यात येणार आहे.
- माझे शिक्षक मोबाईलचा, संगणकाचा वापर उत्तमप्रकारे करत आहेत हे **You Tube Video** बघीतल्यावर लक्षात येईल.
- सर्व शाळांची व केद्रप्रमुखांची **You Tube Links** सोबत दिल्या आहे.

## 4. कार्यवाहीत आलेल्या अडचणी:-

- सुरुवातीला शिक्षकांची मानसिकता नव्हती.
- मोबाईल बीघडेल याची भीती होती.
- **Internet Coverage** चा **Problem** येत होता.
- वेळ भरपूर लागत होता पण सर्वांनी सहकार्य केले. यातूनच **"शिक्षक आणि तंत्रज्ञान"** हा उपक्रम हाती घेतला.

## आवश्यक साधनांचा विचार

- **Mobiles**
- **Computers**
- **Projectors**

वरील सर्व साधनांचा वापर करुन "तंत्रज्ञानाचा वापर" सहज व सोपा करण्याचा प्रयत्न झाला.

## 8. नवोपक्रमात घेण्यात आलेले उपक्रम

- सर्व शिक्षकांनी **email** वर सुट्टीचा अर्ज माझ्या **Mail ID** वर पाठविणे.
- दिलेल्या **excel Sheet** मध्ये विद्यार्थ्यांचे गुण, भाषा, इंग्रजी, गणित या विषयात नोंदविणे.
- शिक्षकांची माहिती **excel Sheet** मध्ये भरुण पाठविणे.
- स्वतःच्या वर्गात घेतलेल्या उपक्रमाचा 30 ते 50 सेकंदाचा **Video** तयार करुन **Edit** करुन त्यात **Title, Sub, Title** लिहून पाठविणे.
- **ICTC** उपक्रमात **Online Course** करणे.
- **Video** निर्मित स्पर्धेत सहभाग घेणे.

स्वतःचे, शाळेचे **You Tube channel** तयार करणे. इत्यादी उपक्रम घेऊन आमचे शिक्षक तंत्रज्ञानात सक्षम करव्याचा प्रयत्न झाला,

## 9. नवोपक्रम स्थितिचे निरिक्षण-

**"शिक्षक आणि तंत्रज्ञान"** हा नवोपक्रम आमच्या केंद्रात राबविण्यास सुरुवात झाली आणि हळू-हळू शिक्षकांमध्ये जणूकाही स्पर्धाच लागली. प्रत्येक शाळेतून अध्यापनाचे अनेक **Video** वर्गाची माहिती, शाळेची माहिती तातडीने पाठविणे, **Student Portal, Aadhar Portal** चे कार्य, **Vinoba App** चा वापर. या कार्यात माझे गुमगाव केंद्र अग्रेसर राहू लागले.

प्रायोगीक तत्वावर घेतलेल्या या उपक्रमाचा परिणाम असा झाला की, आमचे शिक्षक, विद्यार्थी विविध स्पर्धामध्ये **Online Course** मध्ये सुद्धा यश प्राप्त करू लागले.

**10. नवोपक्रमासाठी इतरांची मदत -**

या नवोपक्रमात गुमगाव केंद्रातील **Technosavy** शिक्षक दिपाली काठोके, राजकुमार चौबे, अश्लेषा नाईक, आशा मेश्राम यांचे सहकार्य लाभले.

**11. नवोपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे-**

खाली दिलेल्या तक्त्यातील सर्व **Links** माझ्या कार्याच्या परीणामाचा सबळ पुरावा म्हणून आणि माझ्या नवोपक्रमास परिणामकारकरित्या आपणासमोर मांडण्यात सहकार्य करतील. शिवाय काही फोटो सुद्धा सोबत दिलेले आहेत.

**नवोपक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही**

**1. तंत्रज्ञान वापरासाठी वातावरण निर्मिती -**

केंद्रातील सर्व मुख्याध्यापक शिक्षक यांच्या मनातील तंत्रज्ञानाच्या वापराविषयी भिती दूर करण्यासाठी हसत खेळत सुरुवात केली

**उपक्रम** 1 - **Whats' app** वरील **Post** ला **tag** करून उत्तरे लिहीणे.

**साहित्य** - मोबाईल, इंटरनेट

**तंत्र** - सराव व दृढीकरण

**फायदे =**

1) मोबाईल खराब होईल ही भिती दूर झाली.
2) **Internet** जास्त खर्च होत नाही हे समजले.
3) ज्या प्रश्नाला उत्तर दयायचे, ते कार्य सोपे झाले.
4) शिक्षक एकमेकांना **What's app** व्दारे **Connect** झाले.

**उपक्रम 2 - email पाठविणे**

1) **email** द्वारे सुट्टीचा अर्ज पाठविणे
2) **email** द्वारे **PDF** पाठविणे, केंद्रप्रमुखांना माहिती पुरविणे.

3) आलेल्या **Email check** करणे, **Print** काढणे.

**साहित्य - Mobile, Net, Computer, Printer**

**तंत्र -** सोप्याकडून कठिणाकडे

**फायदे**

1. शिक्षकांची भिती दूर झाली.
2. शिक्षक माहितीचे आदानप्रदान जलद गतीने करू लागले
3. **Mail Box Open** करून पाहू लागले.
4. वरिष्ठ कार्यालयाला सुद्धा **email** करु लागले

**उपक्रम - 3 - मोबाईल व्दारे Excel Sheet चा वापर करून माहिती साठवणे, Video** निर्मिती करणे

**साहित्य - Mobile, Tab, Net, Computer, Printer**

**तंत्र -** सोप्याकडून कठिणाकडे

**फायदे -**

1) तंत्रज्ञानाच्या वापराचा संकोच दूर झाला.
2) कोणतीही माहिती कागद न वापरता जलद गतीने पाठवू लागले.
3) पेपरलेस वर्ग, शाळाकडे वाटचाल सुरु झाली.
4) उत्तम **video** निर्मिती होऊ लागली.
5) **you tube** चॅनल्स तयार झालेत.

**"शिक्षक आणि तंत्रज्ञान"** या नवोपक्रमांतर्गत घेतलेल्या सर्व उपक्रमांचे विश्लेषण खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | कृती /उपक्रम | सहभागी शिक्षक | उत्तम कार्य करणारे |
|---|---|---|---|
| 1 | **email** चा वापर | 32 | 25 |
| 2 | **Video** निर्मिती | 32 | 32 |
| 3 | **excel Sheet** चा वापर | 32 | 30 |
| 4 | **Online Course** | 10 | 07 |
| 5 | **Diksha App** चा वापर | 32 | 07 |
| 6 | **Vinoba App** चा वापर | 32 | 32 |
| 7 | **You Tube** चॅनल तयार करणे | 32 | 19 |

**नवोपक्रमाची यशस्वीता**

हा नवोपक्रम हिंगणा तालूक्यातील गुमगाव केंद्रात समाविष्ट 12 शाळा व 32 शिक्षकांसाठी राबविण्यात आला. आजमितीस 32 ही शिक्षक तंत्रज्ञानाशी निगडीत कार्य करण्यास मागे राहत नाहीत. परंतू सराईतपणे तंत्रज्ञानाचा वापर करून स्वतःची प्रगती करणारे शिक्षक 80% आहेत.

- वर्ग, शाळा, केंद्र पेपरलेस होऊ लागले आहे.
- शाळेलील संगणकाचा वापर सुरु झाला आहे.
- ग्रा.पं. कडून संगणक मिळवण्याची होड लागली आहे.
- विविध माहिती जलद गतीनो आदानप्रदान होत आहे.
- गुमगाव केंद्र प्रत्येक कार्यात अग्रेसर झाले आहे.
- विद्यार्थी, पालक यांच्याशी समन्वय उत्तम झाला आहे.
- आपला वर्ग, आपली शाळा **Digital** करण्याकडे वाटचाल सुरु झाली.
- **Online course** मध्ये सहभागी होऊन केंद्रातील 4 शिक्षकांनी पुरस्कार मिळवले आहे.


- विद्यार्थ्यांची शिकण्याची गती वाढून, पालकांचे समाधान होऊ लागले आहे.
- शाळांची पटसंख्या शिक्षकांच्या तंत्रज्ञानामुळे वाढू लागली आहे.

राज्याचे शालेय शिक्षण सचिव मा. श्री रणजीत सिंह देओल, नागपूर विभागाचे शिक्षण उपसंचालक मा. श्री. नरड साहेब, माध्यामिक शिक्षणाधिकारी मा. श्री. काटोलकर साहेब, प्राथमिक शिक्षणाधिकारी मा. श्रीमती रोहीणी कुंभार मॅडम यांनी गुमगाव केंद्रातील शाळांना भेटी देऊन विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, पालकांच्या कार्याचे कौतूक सुद्धा केले आहे.

माझ्या ह्या **"शिक्षक आणि तंत्रज्ञान"** नवोपक्रमाच्या यशाचे खरे मानकरी गुमगाव केंद्रातील 12 शाळेतील सर्व उत्साही, होतकरु शिक्षक आहेत. म्हणून सर्व शिक्षकांचे मनःपूर्वक आभार.

❖❖❖❖❖❖

# पुरावे




केंद्रप्रमुख श्री भुपेश चव्हाण शिक्षकांना धडे देतांना






गुमगाव केंद्रातील शिक्षक मोबाईलवर तंत्रज्ञानाचे धडे घेतांना

# शालेय शिक्षण सचिवांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद..गुमगावच्या जिल्हा परिषद शाळेला दिली भेट;विद्यार्थी, शिक्षकांचे केले कौतुक



**गुमगाव,** राज्याचे शालेय शिक्षण विभाग सचिव रणजित देओल यांनी हिंगणा तालुक्यातील गुमगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,गुमगाव क्रमांक २ ला भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला.शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक आणि पालकांशी चर्चा केली. शाळेचे नाविन्यपूर्ण उपक्रम,शाळेची वाढती पटसंख्या,विद्यार्थ्यांची प्रगती,शालेय स्वच्छता आणि शाळेतील आय.सी.टी.सी.लॅबचे तोंडभरून कौतुक करीत शाळेचे विद्यार्थी, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली.

यावेळी शिक्षण उपसंचालक उल्हास नरड,शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) रवींद्र काटोलकर,शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ) रोहिणी कुंभार,गटशिक्षणाधिकारी जोत्सना हरडे यांची उपस्थिती होती. शिक्षण सचिवांनी शाळेला भेट देऊन विद्यार्थी,शिक्षक आणि पालकांशी चर्चा केली.शाळेचा संपूर्ण परिसर बघितला.शाळेत सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली.शाळेतील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेतून घेतलेल्या मुलाखतीला त्यांनी उत्तम प्रतिसाद दिला.इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजीमध्ये सांगितलेल्या स्टोरीचे कौतुक केले.शाळेतील विद्यार्थी बोलके असल्याबाबत तसेच शाळेचे कार्य उत्तम सुरू असल्याबाबत अधिकाऱ्यांनी शेरा देऊन शाळेचे मुख्याध्यापक अनिल तुरारे, शाळेतील शिक्षक अमृता तिवारी,प्रीती खंगार, आशा मेश्राम,मेघना तिवस्कर,वसंत चहांदे, अनिता चहांदे यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत उत्तम कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी केंद्रप्रमुख भुपेश चव्हाण उपस्थित होते.

**लोकमत**

# शालेय शिक्षण सचिवांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

## गुमगाव, सालई दाभा येथील शाळांना भेटी



गुमगाव येथील जि. प. शाळेत विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शालेय शिक्षण सचिव रणजित देओल आणि अधिकारी.




**कॉफी वीथ सीईओ**

**कार्यक्रमात गुमगाव केंद्रातील शिक्षक, विद्यार्थी, केंद्रप्रमुख सहभागी.**

**Youtube links**

1) https://youtube.com/@ashameshram2924?si=kB9cyiFqLIKO_pkm
2) https://youtube.com/@user-il5mh1gr7p?si=F4myLfpIs9gsE-Bv
3) https://youtube.com/@zppsshivmadkadnyanvardhini8781?si=MgpBs3hZXj3Cb3mo
4) https://youtube.com/@z.p.primaryschooldatala5316?si=JF736T3uE_nPswAY
5) https://youtube.com/@AshleshaNaik1987?si=ioXB3LSxjFI19K3d
6) https://youtube.com/@MyschoolGumgaon1?si=_QcTGVfIJ0z1jUAM
7) https://youtube.com/@HarshaModak-1234?si=44aaC1EIuwZ6UW_C
8) https://youtube.com/@Archanapatmase?si=2B7fTTQtIRkEeJhT
9) https://youtube.com/@z.p.primaryschoolkanholigu5099?si=ptNHYCU5xMx1-uev
10) https://youtube.com/@dipalikathoke4389?si=VZjRaOVIT3ZXSBKF

“The Internet is so big, so powerful and pointless that for some people is is a complete substitute for life.”

“Technology will never replace great teachers but technology in the hands of great teacher is transformational. Technology makes what was ones impossible possible.”

# Thank you